# अध्यापन कार्यनीतींच्या निर्मितीतील शिक्षकांची भूमिका

**डॉ. सीमा प्रकाश परदेशी**
सहा. प्राध्यापक, के.बी.पी. कॉलेज,
उरुण–इस्लामपूर

**सारांश** (*Abstract*)–

*भावनिक सुरक्षितता, लोकशाही वातावरण, कृतींना वाव, आव्हानात्मक परिस्थितीत काम करण्याची प्रेरणा या सर्वांसाठी मिळालेले सहकार्य या सर्वांचा परिणाम म्हणजे, अध्ययन वातावरण होय. अशा पद्धतीने जे एक शिकण्याचे वातावरण तयार होते त्याला अर्थपूर्ण अध्ययन वातावरण म्हणतात. असे अध्ययन वातावरण तयार करणे हे शिक्षकासमोर एक आव्हान असते. त्यामुळेच असे ज्ञानसंरचनावादी अध्ययन वातावरण निर्मिती करताना शिक्षकाने काय करायला हवे हे नीटपणे लक्षात घेणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने या लेखाची मांडणी केलेली आहे.*

***संकेत शब्द (Keywords)– ज्ञानसंरचनावादी अध्ययन, ज्ञानसंरचनावादी अध्यापन कार्यनिती, शिक्षक भूमिका***

ज्ञानसंरचना निर्मितीसाठी आवश्यक अध्ययन वातावरणाचा प्रमुख घटक म्हणजे ज्ञानसंरचनावादी अध्ययन–अध्यापन कार्यनिती ज्ञानसंरचना निर्मिती विद्यार्थी स्वत: स्वत:च्या अध्ययनातून ज्ञानसंरचनांची निर्मिती करतो. म्हणूनच ज्ञानसंरचनावादी अध्यापन कार्यनिती या एकप्रकारे विद्यार्थ्यांच्या अध्ययन कार्यनितीच असतात. आणि यासाठी शिक्षकांनी वातावरण उपलब्ध करून देणे म्हणजेच अध्यापन होय. ज्ञानसंरचनावादानुसार अध्यापन कार्यनिती ठरविताना 'ज्ञानसंरचना निर्मिती प्रक्रिया' समोर ठेवूनच या कार्यनितींची निवड–संघटन–नियोजन करावे लागते.

ज्ञानसंरचनावादी अध्ययनाची तात्विक भूमिका, विविध विषयाची उद्दिष्टे यांचा विचार करुन तसेच तज्ज्ञ व मार्गदर्शकांशी चर्चा करून प्रस्तुत संशोधनामध्ये ज्ञानसंरचनावादी अध्ययन वातावरणासाठी पुढील प्रमाणे अध्ययन कार्यनिती निश्चित करता येतात.

१. अध्ययनार्थ्यांचे पूर्वानुभव शोधन कार्यनिती (Investigate of Learners Previous Experience)
२. अवगामी अध्ययन कार्यनिती
३. उद्‌गामी अध्ययन कार्यनिती
४. दिशांकीत चर्चा कार्यनिती
५. अन्वेषणात्मक चर्चा कार्यनिती
६. विमर्षी चर्चा कार्यनिती

या अध्ययन कार्यनितींची निश्चिती केल्यानंतर कार्यनितींसाठी आवश्यक अध्ययनकृती स्त्रोत व साधनांची निश्चिती करावी लागते.

**अध्ययनकृती स्त्रोत – साधने निश्चिती**

अध्ययन वातावरण कार्यनिती विकसनातील एक प्रमुख घटक म्हणजे अध्ययनकृती व त्याला अनुसरून स्त्रोत, साधनांची निश्चिती होय. शैक्षणिक तंत्रविज्ञान, इतिहास आशययुक्त अध्यापन, अनुदेशन प्रणाली, माहिती तंत्रविज्ञान, इतिहास अध्ययन अध्यापनविषयक संशोधने यासारख्या साहित्यात अनेक अध्ययनकृतींचा निर्देश तपशीलासह दिला आहे. अर्थात, त्यातील सर्वच अध्ययनकृती या विद्यार्थीकेंद्री व ज्ञानसंरचना निर्मितीस अनुकूल आहेत असे नाही. त्यामुळेच विद्यार्थ्यास ज्ञानसंरचना निर्मितीसाठी उपयुक्त अशा अध्ययनकृती निवडून त्यातून विविध विषयातील ज्ञानसंरचना तसेच विद्यार्थी संख्या, विद्यार्थ्यांची गुणवैशिष्ट्ये, उपलब्ध वेळ,

VOL- IX ISSUE- XI NOVEMBER 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x


विद्यार्थी अध्ययन वर्तन कौशल्ये इत्यादी निकषांच्या आधारे ज्या अध्ययनकृतींची व त्याला अनुसरून अध्ययन स्त्रोत व साधनांची निश्चिती करता येते ते पुढील सारणी मध्ये दर्शविले आहे.

**अध्ययन स्त्रोत, साधने व अध्ययनकृती**

| अध्ययन स्त्रोत | अध्ययन साधने | अध्ययनकृती |
|---|---|---|
| संदर्भ पुस्तके<br>इतर इयत्तांची इतिहास पाठ्यपुस्तके<br>इतर विषयांची पाठ्यपुस्तके<br>संकेतस्थळावरील विषय संबंधित आशय<br>व्हिडिओ क्लिप<br>कात्रणे | एल.सी.डी. प्रोजेक्टर<br>लॅपटॉप<br>डिस्प्ले बोर्ड<br>ऑडिओ टेपरेकॉर्डर<br>शब्दपट्ट्या | चर्चा (गट, युग्म, समस्येवर आधारित, निरीक्षणाधारित)<br>संकल्पना चित्र<br>शब्दखेळ वाचनावर आधारित प्रश्नसंधी<br>सारांशलेखन<br>वर्गीकरण<br>सारणीभरण<br>कालरेषा<br>नाट्यीकरण<br>पोस्टर<br>सादरीकरण |

**शिक्षक भूमिका**

विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानसंरचनांची निर्मिती जेवढी अध्ययनकृती, अध्ययन स्त्रोत, साधने यावर अवलंबून असते तेवढीच ती शिक्षकांच्या भूमिकांवर व त्या भूमिकाधारित विविध कृतींवर अवलंबून असते. कारण अध्ययनकृती, स्त्रोत, साधने यांच्या मदतीने शिक्षक ज्या भूमिका पार पाडतो त्यातूनच ज्ञानसंरचना निर्मितीसाठी आवश्यक असे अध्ययन वातावरण तयार होते. त्या दृष्टीने शिक्षकांच्या भूमिकांची निश्चिती केलेली आहे. पुढील आकृती मध्ये दर्शविल्याप्रमाणे शिक्षक भूमिकांची निश्चिती केली आहे.




**ज्ञानसंरचना निर्मितीसाठी आवश्यक शिक्षक भूमिका**

आकृतीत दर्शविल्याप्रमाणे अध्ययन वातावरणाची निर्मिती शिक्षकाने, मग तो कोणत्याही विषयाचा असो, त्याने करून दिली पाहिजे ही अपेक्षा ज्ञानसंरचनावादाकडून व्यक्त होताना दिसते. अर्थात, विषय निरपेक्ष या कृती लक्षात घेतल्या तरी विषयसापेक्ष अशा काही भूमिका व विशेषत: त्या भूमिकानिहाय अपेक्षित असणारी कार्ये यामध्ये काही फरक असल्याचे दिसते. यासाठीच इतिहास विषयासंदर्भात अध्ययन वातावरण निर्मितीकरिता व त्यातून तयार होणाऱ्या ज्ञानसंरचनांच्या फलितांसाठी शिक्षकाची भूमिका व त्या भूमिकानिहाय अपेक्षित कार्य याचे आकलन करून घ्यावे लागेल. ज्ञानसंरचनावादी अध्ययन वातावरणासंदर्भातील या भूमिका व त्याला अनुसरून असणारे अपेक्षित कार्य पुढील सारणी मध्ये दिले आहे.

**ज्ञानसंरचनावादी अध्ययन वातावरण निर्मितीसाठी शिक्षक भूमिका व त्यानुसार अपेक्षित कार्य**

| शिक्षक भूमिका | शिक्षकाचे भूमिकानिहाय अपेक्षित कार्य |
|---|---|
| १. **गटनिर्माता** | योग्य गटांच्या निर्मितीचे कार्य हे सहकार्यात्मक अध्ययनासाठी आवश्यक ठरते. विद्यार्थ्यांच्या गुणवैशिष्ट्यांनुसार व अध्ययन घटकाच्या उद्दिष्टांनुसार गटांची योग्य रचना करण्याचे कार्य. |

| | |
|---|---|
| २. नियोजक | समस्याकेंद्री अध्ययनास पूरक पाठांची व अध्ययन अनुभवांची रचना करणे, इतिहासातील ज्ञानसंरचनानिर्मितीसाठी विविध अध्ययन अनुभवांचे नियोजन, उदा. चर्चेसाठी पार्श्वभूमी, प्रकल्पांचे नियोजन इत्यादींमध्ये नियोजकाची भूमिका महत्वाची ठरते. |
| ३. मार्गदर्शक | कृतिकेंद्री अध्ययनाला अनुसरून गटांना मार्गदर्शन, तंत्रानुसार, उद्दिष्टांनुसार, घटकांनुसार व गटांनुसार अध्ययन कार्यासाठी मार्गदर्शन |
| ४. सुविधा दाता/ संधीदाता | आशयाला अनुसरून गटांना अध्ययनासाठी आवश्यक सुविधा व संधीचा पुरवठा करणे, इतिहास अध्ययन अध्यापनामध्ये आवश्यक स्त्रोतांच्या उदा. बखरी, पोवाडे, नाणी, हस्तलिखिते, ऐतिहासिक पुस्तके, काव्य, कादंबऱ्या, आधुनिक स्त्रोत, कॅसेट, चित्रपट, सीडी इत्यादी स्त्रोतांची माहिती, संग्रह व त्यांचे उपयोजन उपलब्ध करून देण्याचे कार्य, प्रकल्प, गटचर्चा इत्यादीसाठी विषय, वेळ, साहित्य, नियोजन, व्यवस्थापन, मूल्यमापन इत्यादीच्या संधी पुरविण्याचे कार्य. |
| ५. सहकारी/मित्र | गटांमध्ये अध्ययन प्रक्रियेसाठी आवश्यक सहकार्य, इतिहासामध्ये ज्ञानप्राप्तीवेळी प्रत्यक्ष सहकाऱ्याच्या भूमिकेत तसेच वय, प्रतिष्ठा इत्यादीचा वेळेनुरूप त्याग करून एका मोठ्या मित्राची भूमिका शिक्षकाला पार पाडावी लागते. |
| ६. प्रेरणास्त्रोत | सहकार्यात्मक अध्ययनासाठी वेळोवेळी प्रेरणा, योग्य अध्ययनासाठी प्रोत्साहन, योग्य आंतरक्रियांसाठी प्रेरणा, इतिहासातील ज्ञानसंरचनेसाठी आवश्यक असे वेगवेगळे प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी वेळोवेळी विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे, ज्ञान निर्मितीचा आनंददायी अनुभव घेण्यासाठी विद्यार्थ्यांना सतत प्रोत्साहित करण्याचे कार्य, गटांमध्ये योग्य उद्दिष्टसाध्यतेसाठी प्रेरणा देण्याचे कार्य. |
| ७. व्यवस्थापक | गटांमधील वैयक्तिक, आंतरवैयक्तिक नातेसंबंधांचे, कार्याचे, फलितांचे व्यवस्थापन, पद्धतीनुसार आवश्यक वस्तूंचे वितरण, वेळेचे वितरण, नियंत्रण व या सर्व बाबींचे व्यवस्थापन ही कार्ये शिक्षकाला पार पाडावी लागतात. |
| ८. विश्लेषक | गटांमध्ये आंतरक्रियांचे योग्य विश्लेषण, हेतू-कार्य-निष्पत्ती इत्यादीला अनुसरून अध्ययन प्रक्रियेचे विश्लेषण शिक्षकाने गटप्रमुख या नात्याने करणे गरजेचे ठरते. |
| ९. मूल्यमापक | गटांमधील कार्याचे, प्रक्रियेचे, फलितांचे मूल्यमापन, त्याचबरोबर गटांमधून विद्यार्थ्यांच्या आंतरक्रियांमधून निघालेली तथ्ये, त्यांची योग्यायोग्यता, दुरूस्ती, पुनर्भरण इत्यादीचे मूल्यमापन शिक्षकाला करावे लागते. |
| १०. संशोधक | गटांमधील हेतू-कार्य-निष्पत्ती इत्यादीला अनुसरून शोध व उपयोजनाचे कार्य, त्याचबरोबर पाठ्यघटकांना अनुसरून सहकार्यात्मक अध्ययन कार्यनीतीचा शोध, वापर योग्य पद्धतीचा शोध, योग्योग्यतेचा शोध, विद्यार्थी वर्तन बदल, कारणमिमांसा, निष्कर्ष इत्यादीची वेळोवेळी तपासणी, नियोजन, वापर यासारख्या बाबींचा शोध व उपयोजनाचे कार्य शिक्षकाला करावे लागते. |

मुले शिकण्यात गुंतलेली आहेत, अशा ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेत शिक्षकांनी जर अधिक क्रियाशीलपणे सारणी मध्ये नमूद केलेली प्रत्येक भूमिका पार पाडली तर मुलांच्या बौद्धिक जाणीवांमधील त्यांची भूमिका अधिक अर्थपूर्ण बनू शकते. शिक्षकाने त्याच्या या भूमिकेला अनुसरून मुलांना प्रश्न विचारण्यास प्रोत्साहीत करणे, शाळेत शिकत असलेल्या बाबींचा बाहेरील घडामोडींशी संबंध जोडणे, स्मरणावर आधारित एकाच प्रकारच्या उत्तराच्या अपेक्षेपेक्षा मुलांना त्यांच्या शब्दात, त्यांच्या अनुभवांच्याआधारे उत्तरे देण्यास प्रोत्साहन देणे यासारख्या केलेल्या कृती या सर्व मुलांची समज विकसित करण्यासाठी साहाय्यभूत ठरणाऱ्या काही छोट्या पण महत्वाच्या अशा कृती ठरू शकतात. या व यासारख्या अनेक कृतींचा समावेश शिक्षकाने आपल्या अध्यापन कार्यनितींमध्ये जाणीवपूर्वक करावा.

**समारोप-**

विद्यार्थी दैनंदिन अनुभवातून वा विविध माध्यमांशी येणाऱ्या संपर्कातून काही कल्पना/समज/धारणा तयार करतो. परंतु शिक्षक त्यांची नोंद घेतील व प्रशंसा करू शकतील अशा पद्धतीने

विद्यार्थी त्या व्यक्त करू शकत नाहीत. किंबहुना त्या व्यक्त करण्यास तेथे वाव नसतो. खरे तर शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या शाळेबाहेर तयार झालेल्या कल्पना, समज, धारणा अशा प्रकारच्या ज्ञानाच्या सगळ्या रूपांचा आदर केला पाहिजे व विद्यार्थ्यांकडे असणाऱ्या ऊर्जेचा, अध्ययनकौशल्यांचा, पूर्वानुभवांचा, कौशल्यपूर्वक व सर्जनशील असा वापर करता येऊ शकेल असे अध्ययन वातावरण निर्माण करणाऱ्या अध्यापन कार्यनितींची आखणी केली पाहिजे. ज्या अध्यापन कार्यनिती विद्यार्थ्यास शिकण्यात क्रियाशीलपणे गुंतवून ठेवू शकतील तसेच चिंतनाद्वारे सिद्धांत उभारणी करणे, चौकसपणे शोध घेणे, चातुर्याने अंदाज करणे यासारख्या मूलभूत अध्ययनवृत्तींना चालना देऊ शकतील विद्यार्थ्यांच्या विशिष्ट विषयातील/ अध्ययनप्रक्रियेतील अर्थनिर्मिती व ज्ञानसंरचनेच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या या अध्ययनवृत्तींचा विकास करू शकणारे अध्ययन वातावरण निर्माण करू शकणाऱ्या अध्यापन कार्यनितींचे विकसन करणे हे प्रत्येक विषय शिक्षणाची व शिक्षकाची मूलभूत व प्रारंभिक गरज आणि भूमिका असल्याचे दिसते.

**संदर्भ–**

**इंग्रजी–**

1. Bell, Beverley & Gilbert, John (1994). Teacher Development As Professional, Personal & Social Development. Teaching and Teacher Education. 483-497.
2. Curriculum Framework for Teacher Education (2006). National Council for Teacher Education in Collaboration with National Council of Educational Research and Training.
3. Curtis, David. (2003). Constructivist Methods for the Secondary classroom. Engaged minds. United State of America : Pearson Education, Inc.
4. Haqq, Abdul & Ismat (1998). Constructivism in Teacher Education Considerations for Those who would link practice to Theory. ERIC Digest, 1-7.
5. Jodallah. E. (1996). Reflective theory & Practice : A Constructivist Process for curriculum & instructional decisions – Action in Teacher Education. 18(2), 73-85.